# फ्लिपकार्ट फाउंडेशनद्वारे, प्रथम इन्फोटेक फाउंडेशनच्या सहयोगाने, आर्थिकदृष्ट्या वंचित तरुणांना, डिजिटल साक्षरता व रोजगारक्षमतेसाठी आवश्यक २१व्या शतकातील कौशल्ये आत्मसात करण्यासाठी, सहाय्य

- *हा 'डिजिटल साक्षरता आणि रोजगारक्षमतेच्या २१व्या शतकातील कौशल्यांचा' उपक्रम १८ ते ३५ ह्या वयोगटातील तरुणांच्या गरजांची पूर्तता करणारा आहे*
- *समाजाच्या दुर्लक्षित समुदायांतील १,२५० तरुणांना ह्याचा थेट फायदा होणार असून, त्यांना उद्योगक्षेत्रातील रोजगाराच्या संधींसाठी सज्ज राहण्याची क्षमता ह्यामुळे प्राप्त होणार आहे*

**मुंबई, १७ एप्रिल २०२३:** फ्लिपकार्ट समूहातील फ्लिपकार्ट फाउंडेशनने, वंचित समुदायांसाठी अधिक समावेशक व क्षमता देणारे अध्ययन वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून, प्रथम इन्फोटेक फाउंडेशनशी (पीआयएफ) सहयोग केला आहे. डिजिटल लिटरसी अँड ट्वेंटीफर्स्ट सेंच्युरी स्किल्स फॉर एम्प्लॉयबिलिटी (साक्षरता व २१व्या शतकातील रोजगारक्षमतेसाठी आवश्यक कौशल्ये) ह्या उपक्रमाच्या माध्यमातून, १८ ते ३५ ह्या वयोगटातील तरुणांना, प्रथम इन्फोटेक फाउंडेशनच्या मुंबईभरातील केंद्रांमधून, रोजगारक्षमतेच्या कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाईल व सुसज्ज केले जाईल. पीआयएफच्या नेतृत्वाखाली दिल्या जाणाऱ्या प्रशिक्षणामुळे लाभार्थींना सुरुवातीच्या स्तरावरील नोकऱ्या मिळवण्यासाठी सुसज्ज केले जाईल. ह्यामध्ये एका संमिश्र (हायब्रिड) प्रारूपाचा समावेश असून, ह्याद्वारे तरुणांना डिजिटल, परस्परांमार्फत तसेच कृती आधारित अध्ययनाद्वारे रोजगारक्षमता पुरवली जाईल.

डिजिटल विषमता दूर करण्यासाठी काम करणाऱ्या प्रथम इन्फोटेक फाउंडेशन ह्या ना-नफा तत्त्वावरील संस्थेशी फ्लिपकार्टने केलेल्या सहयोगामागे, भारतातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल समुदायांतील तरुणांमध्ये कौशल्य विकास घडवून आणण्याचे तसेच त्यांना प्रशिक्षण देण्याचे, उद्दिष्ट आहे, जेणेकरून, ह्या तरुणांना तांत्रिकदृष्ट्या स्पर्धात्मक राहता येईल आणि आर्थिक संधी उपलब्ध करून घेता येतील.

**हा १२ महिन्यांचा अभ्यासक्रम मोफत असून, समाजाच्या दुर्लक्षित समुदायांतील १८ ते ३५ ह्या वयोगटातील तरुणांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट ह्यामागे आहे. महाराष्ट्रातील मुंबईमधील मुलुंड, चेंबूर, वरळी, दहीसर आणि अँटॉप हिल ह्या भागांतील पाच केंद्रांमध्ये हे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तरुणांमधील डिजिटल साक्षरता व सॉफ्ट स्किल्स (नोकरीसाठी उपयुक्त कौशल्ये) अधिक सफाईदार करण्याचा प्रयत्न ह्या उपक्रमाद्वारे केला जात आहे. ह्या उपक्रमाचा लाभ ५,००० जणांना (१,२५० तरुणांना प्रत्यक्ष लाभ तर त्यांच्या ३,७५० कुटुंबियांना अप्रत्यक्ष लाभ) होणे अपेक्षित आहे. ह्या उपक्रमाचा लाभ घेणाऱ्यांना आयुष्य प्रतिष्ठेने तसेच ध्येयासह जगण्याची क्षमता प्राप्त होणार आहे.**

***फ्लिपकार्टचे प्रमुख कॉर्पोरेट व्यवहार अधिकारी व फ्लिपकार्ट फाउंडेशनच्या संचालक मंडळाचे सदस्य रजनीश कुमार*** *ह्या सहयोगाबद्दल म्हणाले, "तरुणांना तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण व कौशल्ये प्राप्त करण्याची संधी उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्यात रोजगारक्षम कौशल्यांचा विकास करण्यावर फ्लिपकार्ट फाउंडेशन लक्ष केंद्रित करते. राष्ट्रातील तरुणवर्गासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे रोजगारनिर्मिती करून त्यांना उपजीविकेच्या साधनांबाबत सहाय्य करण्याच्या आमच्या उद्दिष्टाशी सुसंगत उद्दिष्टाने काम करणाऱ्या, प्रथम इन्फोटेक फाउंडेशनसोबत सहयोग जाहीर करताना, आम्हाला सन्मानित झाल्यासारखे वाटत आहे. ह्या सहयोगाच्या माध्यमातून आम्ही फ्लिपकार्ट समूहाचे दुर्लक्षित समुदायांसाठी संधी निर्माण करण्याचे प्रयत्न पुढे नेऊ शकू. त्याचप्रमाणे भारतातील डिजिटल साक्षरता व अध्ययनाच्या गरजांची पूर्तताही करू शकू."*

**प्रथम इन्फोटेक फाउंडेशनचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी प्रेम यादव म्हणाले,** *"डिजिटल साक्षरता आणि २१व्या शतकात आवश्यक कौशल्ये हे जगभरातील नोकरीच्या संधी घेण्यासाठी महत्त्वाचे घटक आहेत. आम्ही वंचित पार्श्वभूमीतून येणाऱ्या तरुणांना सक्षम करण्यासाठी हा प्रकल्प सुरू करत आहोत. ह्याद्वारे त्यांची रोजगारक्षमता व सॉफ्ट स्किल्स वाढवली जाणार आहे आणि आजच्या रोजगार बाजारपेठेत त्यांच्यासाठी मागणी निर्माण होईल ह्यादृष्टीने त्यांना सक्षम केले जाणार आहे. फ्लिपकार्ट फाउंडेशनने आम्हाला दिलेल्या पाठिंब्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत आणि आम्ही एकत्रितपणे, लाभार्थी तरुण व त्यांच्या कुटुंबियांच्या आयुष्यांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणू शकतो अशी आशाही आम्ही व्यक्त करतो."*

ह्या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून, पीआयएफ लाभार्थींना समूहाधारित प्रकल्प कामासाठी लॅपटॉप्स पुरवणार आहे. परस्पर अध्ययनासाठी हे संप्रेरकासारखे काम करेल. ह्या अभ्यासक्रमात वापरला जाणारा आशय (काँटेण्ट) प्रामुख्याने व्हिडिओवर आधारित ट्युटोरियल्स हा असेल. आमच्या डिजिटल साक्षर ह्या मोफत अध्ययन ॲपवर, वेबसाइटवर तसेच यूट्यूब वाहिनीवर, तो संदर्भासाठी उपलब्ध आहे. प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान केली जातील आणि आघाडीच्या सहयोगी रोजगार फर्म्ससह घेतलेल्या रोजगार मेळाव्यांद्वारे नोकरी मिळवण्यातही त्यांना मदत केली जाईल.

गेल्या वर्षभरात फ्लिपकार्ट फाउंडेशनने आंध्रप्रदेश, आसाम, हरयाणा, कर्नाटक, तेलंगण, उत्तराखंड, उत्तरप्रदेश आणि पश्चिम बंगाल ह्या राज्यांतील वंचित समुदायांसोबत काम केले आहे. जास्तीतजास्त व्याप्ती व शाश्वत प्रभावाची खात्री करण्याच्या उद्दिष्टाने, फाउंडेशनने, समाजातील अकुशल व वंचित समुदायांतील लोकांना विविध क्षेत्रांत सेवा दिली आहे, सहाय्य केले आहे आणि सक्षम केले आहे.

### About Pratham InfoTech Foundation

Pratham InfoTech Foundation (www.pif.org.in) is a non-profit organisation that works in India to bridge the digital divide, facilitate the adoption of information technologies (IT) in education, and equip disadvantaged youths with skills, tools and capabilities that the new global economy demands. An NGO that works to provide quality education to the underprivileged children of India, PIF runs IT based training, educational and community capacity building programs in underserved schools and communities.

### About the Flipkart Group

The Flipkart Group is one of India’s leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, Flipkart Wholesale, Flipkart Health+, and Cleartrip.

Started in 2007, Flipkart has enabled millions of sellers, merchants, and small businesses to participate in India's digital commerce revolution. With a registered customer base of more than 450 million, Flipkart's marketplace offers over 150 million products across 80+ categories. Today, there are over 11 lakh sellers on the platform, including Shopsy sellers. With a focus on empowering and delighting every Indian by delivering value through technology and innovation, Flipkart has created lakhs of jobs in the ecosystem while empowering generations of entrepreneurs and MSMEs. Flipkart is known for

pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns, which are customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians.

For more information, please write to media@flipkart.com